# वसई विरार शहर महानगरपालिका

## मा. सर्वसाधारण सभा दिनांक २०/०२/२०१६

## सायं ४.३० वा.

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>विषयाचे नाव</th><th>मा. सर्वसाधारण सभेचा निर्णय</th></tr>
<tr><td>१</td><td>मागील मा. सर्वसाधारण सभा दि. २०/०१/२०१६ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.</td><td>ठराव :- मागील मा. सर्वसाधारण सभा दि. २०/०१/२०१६ रोजीचे इतिवृत्त दुरुस्तीसह कायम करणेत येत आहे.<br>अनुमोदक - चंद्रकांत गोरीवले सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वांनुमते मंजुर</td></tr>
<tr><td>२</td><td>प्रश्नोत्तरे</td><td>
<table>
<tr><td>१</td><td>२०/२/२०१६</td><td>मा. श्री. धनंजय गावडे</td><td>वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दितील बोगस डॉक्टरांची यादी, त्यांचेवर दाखल केलेले गुन्ह्यांची यादी, यास जबाबदार कोण? इ. माहिती</td><td>१) मा. उपायुक्त (वैद्यकीय आरोग्य विभाग), २) मा. वैद्यकीय अधिकारी (डॉ. राणे मॅडम)</td></tr>
<tr><td>२</td><td>२०/२/२०१६</td><td>मा. श्री. धनंजय गावडे</td><td>श्री. ग्लिसन घोन्साल्विस यांना तत्कालीन नवघर नगरपरिषदेने निलंबित करण्याचे कारण, निलंबन आदेशाची व चौकशी अहवालाची प्रत मिळावी</td><td>१) मा. उपायुक्त (आस्थापना), २) मा. सहा. आयुक्त (आस्थापना)</td></tr>
<tr><td>३</td><td>२०/२/२०१६</td><td>मा. श्रीम. शिल्पा सिंग</td><td>श्रीमती निलम निजाई यांना विरार नगरपरिषदेत कामावर केव्हा रूजु केले, त्याबाबत निकष, ठराव, आदेश प्रती इ. माहिती</td><td>१) मा. उपायुक्त (आस्थापना) २) मा. सहा. आयुक्त (आस्थापना)</td></tr>
<tr><td>४</td><td>२०/२/२०१६</td><td>मा. श्री. किरण भोईर</td><td>स.नं. १७६ अ/ १ अ दिवाणमान माती भराव बाबत नोटीस ठेकेदारास दिली असुन महानगरपालिकेने निविदा ठेका काढण्याचे कारण, वेटलँडमध्ये निविदा काढलेबाबत दस्तऐवज इत्यादी माहिती</td><td>१) मा. शहर अभियंता २) मा. सहा. अभियंता, नवघर</td></tr>
<tr><td>५</td><td>२०/२/२०१६</td><td>मा. श्रीमती किरण चेंदवणकर</td><td>सन २०१५-१६ या वर्षात अंध,मुक,बधीर मुलांना अपंग विद्यार्थी व महिलांना मासिक पास, अपंग महिलांना अनुदान, गतीमंद व मतीमंद विशेष बालकांना, अंध व अपंग मुलींना विवाहासाठी अर्थसहाय्य स्वयंरोजगारासाठी अनुदान / खर्च इ. माहिती</td><td>१) मा. सहा. आयुक्त (महिला व बालकल्याण)</td></tr>
<tr><td>६</td><td>२०/२/२०१६</td><td>मा. श्रीमती किरण चेंदवणकर</td><td>वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दित जि.प.शाळा संख्या, शाळा ताब्यात घेतल्या काय? किती शाळांना साधन सामग्री पुरविली, प्रभाग स्तरावर वाचनालये उपलब्ध तसेच सायकल</td><td>१) मा. उपायुक्त (शालेय शिक्षण व वाचनालय) २) मा. सहाय्यक आयुक्त (महिला व बालकल्याण)</td></tr>
</table>
</td></tr>
</table>

<table>
<tr>
<td></td>
<td></td>
<td>
<table>
<tr><td></td><td></td><td></td><td>वाटप योजनेचे उद्दिष्ट व झालेला खर्च इ. माहिती</td><td></td></tr>
<tr><td>७</td><td>२०/२/२०१६</td><td>मा. श्रीमती प्रिती म्हात्रे</td><td>पाणीपुरवठा, विकास शुल्क, फाया प्रोटेक्शन फीचे उत्पन्न, भुयारी गटार अनुदान, वाहनांवर कारवाईबाबत प्रशासकीय शुल्क, सार्व.ठिकाणी थुंकणे, इ. बाबत बिटमार्शल इ. चे अपेक्षित उत्पन्न व प्रत्यक्षात वसुल शुल्क इ. माहिती</td><td>१) मा. उपायुक्त १ व २ २) मा. उपसंचालक, नगररचना ३) मा. उपायुक्त (वाहने) ४) मा. मुख्यलेखाधिकारी ५) मा. नगरअभियंता ६) मा. सहा. आयुक्त (स्वच्छता)</td></tr>
</table>
अनुमोदक - पंकज ठाकूर सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>
ठराव सर्वानुमते मंजुर
</td>
</tr>
<tr>
<td>३</td>
<td>शासकीय पत्रव्यवहार माहितीस्तव</td>
<td>१ महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, नवि. ३४, मंत्रालय, मुंबई - ३२<br>
२ महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग<br>
अनुमोदक - प्रकाश रॉड्रीक्स सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>
ठराव सर्वानुमते मंजुर</td>
</tr>
<tr>
<td>४</td>
<td>मा. स्थायी समितीच्या शिफारसीनुसार सन २०१६/१७ या वित्तीय वर्षाकरीता कर व दर निश्चित करणे.</td>
<td>ठराव/निर्णय :- सदर विषयावर मा. सर्वसाधारणसभेमध्ये चर्चा करण्यांत आली. प्रचलित कर व दरात कोणताही बदल न करता सध्याचेच म्हणजेच सन २०१५-१६ या वित्तीय वर्षात लागू असलेले कर व दर सन २०१६-१७ साठी लागू करावेत, ही मा. स्थायी समितीने केलेली शिफारस मान्य करण्यांत यावी, असा निर्णय ही महासभा घेत आहे.<br>
अनुमोदक - कांता पाटील सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>
ठराव सर्वानुमते मंजुर</td>
</tr>
<tr>
<td>५</td>
<td>श्री. सुधाकर संखे, तत्कालीन प्र. सहाय्यक आयुक्त, प्रभाग समिती 'अे' बोळींज यांचे निलंबनाबाबत.</td>
<td><u>ठराव / निर्णय :-</u> श्री. सुधाकर संखे, तत्कालीन प्र. सहाय्यक आयुक्त, प्रभाग समिती 'ए' बोळींज यांचे प्रकरणी प्रशासनाने निदर्शनास आणलेल्या बाबींचे अवलोकन करण्यात आले. श्री. संखे, यांचे प्रकरणी अर्नाळा पोलीस ठाणे येथे दाखल झालेला गुन्हा तसेच त्यांच्या विरुद्ध सुरु असलेल्या विभागीय चौकशीतील निष्कर्षांच्या अनुषंगाने प्रशासनाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९७९ मधील तरतुदीनुसार आवश्यक ती कार्यवाही करावी असा निर्देश ही महासभा देत आहे.<br>
अनुमोदक - सिताराम गुप्ता सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>
ठराव सर्वानुमते मंजुर</td>
</tr>
<tr>
<td>६</td>
<td>वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती (आय) - वसई</td>
<td>ठराव/निर्णय :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती-आय, वसई येथील कर्मचारी श्रीमती हमरी रमेश गोहिल यांनी महानगरपालिका सेवेतून स्वेच्छानिवृत्ती मिळणेबाबत विनंती केली आहे. श्रीमती हमरी गोहिल यांची २० वर्षाची अर्हताकारी</td>
</tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | आस्थापनेवरील कर्मचारी श्रीमती हमरी रमेश गोहील सफाई कामागार यांना स्वेच्छा निवृत्ती देणेबाबत. | सेवा पुर्ण झाली असल्याने त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम ६६(१) नुसार त्यांची स्वेच्छानिवृत्तीची नोटीस स्विकारुन नोटीसीस तीन महिने पुर्ण झालेनंतर दिनांक ०९/०३/२०१६ रोजी मध्यान्होत्तर त्यांना महानगरपालिका सेवेतुन स्वेच्छानिवृत्त करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच श्रीमती हमरी गोहिल यांना स्वेच्छानिवृत्तीनंतरचे देय असलेले अनुषंगिक लाभ अदा करणेस प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देणेत येत आहे.<br>अनुमोदक - प्रविण शेट्टी सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| ७ | वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती (आय) - वसई आस्थापनेवरील कर्मचारी श्रीमती शारदा बाबु सोलंकी सफाई कामागार यांना स्वेच्छा निवृत्ती देणेबाबत. | **ठराव/निर्णय :-** वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती - आय, वसई येथील कर्मचारी श्रीमती शारदा बाबु सोलंकी यांनी महानगरपालिका सेवेतून स्वेच्छानिवृत्ती मिळणेबाबत विनंती केली आहे. श्रीमती शारदा सोलंकी यांची २० वर्षाची अर्हताकारी सेवा पुर्ण झाली असल्याने त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम ६६(१) नुसार त्यांची स्वेच्छानिवृत्तीची नोटीस स्विकारुन नोटीसीस तीन महिने पुर्ण झालेनंतर दिनांक १३/०३/२०१६ रोजी मध्यान्होत्तर त्यांना महानगरपालिका सेवेतुन स्वेच्छानिवृत्त करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच श्रीमती शारदा सोलंकी यांना स्वेच्छानिवृत्तीनंतरचे देय असलेले अनुषंगिक लाभ अदा करणेस प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देणेत येत आहे.<br>अनुमोदक - प्रविण शेट्टी सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| ८ | वसई-विरार शहर महानगरपालिका आस्थापनेवरील मयत सफाई कामागाराच्या वारसास वारसा हक्क पद्धतीने महानगरपालिका सेवेत समावून घेणेबाबत. | **<u>ठराव / निर्णय</u> :-** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. सफाई २०१५/ प्र.क्र. २६८/ महामंडळे, दिनांक १०/११/२०१५ नुसार लाड समितीचे शिफारसीनुसार वारसा हक्क पध्दतीने कै. भानु मधु सोलंकी यांची वारस नात कु. जागृती राजु सोलंकी यांना महानगरपालिकेच्या सेवेत "सफाई कामगार" या पदावर नियुक्ती देण्यास आजची ही महासभा मंजुरी देत आहे.<br>अनुमोदक - पंकज ठाकूर सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| ९ | वसई विरार शहर महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांना डी.एल.जी.एफ.एम. व एल.एस.जी.डी. परिक्षा उत्तीर्ण झाले बाबत अतिरिक्त वेतनवाढी देणेबाबत. | **ठराव/निर्णय :-** श्री. उमेश ज्ञानेश्वर मसणेकर, लिपीक व सौ. शितल जयंत चव्हाण, लिपीक यांना शासन निर्णयानुसार यापुर्वी अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत घेण्यात येणारी एल.एस.जी.डी. परिक्षा उत्तीर्ण झाल्याने दोन उपरोक्त वेतनवाढी व तसेच एल. जी. एस. उत्तीर्ण झालेबाबत एक अतिरिक्त वेतनवाढीचा लाभ दिलेला आहे. आता श्री. उमेश मसणेकर व सौ. शितल चव्हाण अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, यांचे मार्फत घेण्यात येणारी डी.एल.जी.एफ.एम. (डिप्लोमा इन लोकल गर्व्हनमेंट फायनानशियल मॅनेजमेंट) परिक्षा उत्तीर्ण झाल्याने त्यांना नगरविकास विभागाकडील दिनांक ०३ नोव्हेंबर, २००३ रोजीचे शासन निर्णयानुसार डी.एल.जी.एफ.एम. परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे दिनांकापासुन त्यांचे नियमित वेतनवाढीवर परिणात न होता एक अतिरिक्त वेतनवाढ मंजूर करणेस आजची सभा सर्वानुमते मंजूरी देत आहे.<br>तसेच श्री. कल्पेश मदन पाटील, लिपीक हे प्रथम एल.एस.जी. डी. परिक्षा उत्तीर्ण झाल्याने नगरविकास विभागाकडील दिनांक १८ फेब्रुवारी, १९७५ रोजीचे शासन निर्णयानुसार एल.एस.जी. डी. परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे दिनांकापासुन त्यांचे नियमित |

| | | |
|---|---|---|
| | | वेतनवाढीवर परिणात न होता दोन अतिरिक्त वेतनवाढी मंजूर करणेस आजची सभा सर्वानुमते मंजूरी देत आहे.<br>अनुमोदक - प्रविण शेट्टी सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| १० | वसई-विरार शहर महानगरपालिकेसाठी सन २०१६-१७ या वित्तीय वर्षासाठी किरकोळ स्टेशनरी खरेदी करुन पुरवठा करणेबाबतच्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. | **निर्णय :-** सन २०१६-१७ या वर्षाकरिता वसई-विरार शहर महानगरपालिका अंतर्गत सर्व कार्यालये सांस्कृतिक कार्यक्रम, शालेय कला-क्रिडा, महापौर मॅरेथॉन, वसई विजय उत्सव व वेळोवेळी महापालिका आयोजित विविध कार्यक्रमाकरिता स्टेशनरी साहित्य खरेदी करुन पुरवठा करणेकामी वार्षिक ई-निविदा दर मागविण्यास व त्यासाठी येणाऱ्या रक्कम रु. ८९ लक्ष पर्यंतचे खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.<br>अनुमोदक - नितीन राऊत सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| ११ | वसई-विरार शहर महानगरपालिकेसाठी सन २०१६-१७ या वित्तीय वर्षासाठी स्टेशनरी छपाई खरेदी करुन पुरवठा करणेबाबतच्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. | **निर्णय :-** सन २०१६-१७ या वर्षाकरिता वसई-विरार शहर महानगरपालिका अंतर्गत सर्व प्रभाग समिती कार्यालये, वैद्यकिय आरोग्य विभाग, मुख्यालय व इतर सर्व विभागांना आवश्यकतेनुसार कार्यालयीन स्टेशनरी छपाई करुन पुरवठा करणेकामी तसेच महानगरपालिका अंतर्गत सर्व कार्यालयाशी संबंधित सांस्कृतिक कार्यक्रम, शालेय कला-क्रिडा, महापौर मॅरेथॉन, वसई- विजयोत्सव व वेळोवेळी होणारे विविध कार्यक्रमांकरीता स्टेशनरी व इतर छपाई करुन पुरवठा करणेकामी वार्षिक ई-निविदा दर मागविण्यास व त्यासाठी येणाऱ्या रक्कम रु. १ कोटी ३२ लक्ष पर्यंतचे खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.<br>अनुमोदक - लॉरेल डायस सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| १२ | सन २०१६-१७ वर्षाकरीता वसई-विरार शहर महानगरपालिका सार्वजनिक कार्यक्रम, शालेय क्रिडा महोत्सव, गणेशोत्सव, महिला मेळावे व इत्यादी कार्यक्रमासाठी स्टेज, मंडप, टेबल, पंखे, खुर्च्या, पडदे, साऊंड सिस्टीम इत्यादी व्यवस्था भाड्याने घेणेकामी येणाऱ्या खर्चास मंजुरीबाबत. | **निर्णय :-** सन २०१६-१७ या वर्षाकरिता महापालिकेमार्फत विविध सार्वजनिक कार्यक्रम, महापौर मॅरेथॉन, वसई विजयोत्सव, सार्व. गणेशोत्सव विसर्जन व्यवस्था, महिला मेळावे, शालेय कला-क्रिडा महोत्सव व महापालिका आयोजित विविध कार्यक्रमाकरीता स्टेज, मंडप, टेबल, पंखे, खुर्च्या, पडदे, साऊंड सिस्टीम इत्यादी व्यवस्था भाड्याने पुरवठा घेणेकामी वार्षिक ई-निविदा दर मागविण्यास व त्यासाठी येणाऱ्या रक्कम रु. ९५ लक्ष पर्यंतचे खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.<br>अनुमोदक - हार्दिक राऊत सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| १३ | सन २०१६-१७ वर्षाकरीता वसई-विरार शहर महानगरपालिका सार्वजनिक कार्यक्रम, शालेय क्रिडा महोत्सव, गणेशोत्सव, महानगरपालिका सभा तसेच इतर कार्यक्रमासाठी आवश्यकतेनुसार | **निर्णय :-** सन २०१६-१७ या वर्षाकरिता महापालिकेमार्फत महापालिकेमार्फत विविध सार्वजनिक कार्यक्रम, महापौर मॅरेथॉन, वसई विजयोत्सव, सार्व. गणेशोत्सव विसर्जन व्यवस्था, शालेय कला-क्रिडा महोत्सव, महानगरपालिकेच्या विविध सभा व महापालिका आयोजित विविध कार्यक्रमाकरीता चहापान व्यवस्था, अल्पोपहार, भोजन, पुष्पगुच्छ, फुलांचे हार इ. पुरवठा करण्यास तसेच फोटोग्राफी, व्हिडीओग्राफी इत्यादी व्यवस्था भाड्याने घेणेकामी वार्षिक ई-निविदा दर मागविण्यास व त्यासाठी येणाऱ्या रक्कम रु. १ कोटी १० लक्ष पर्यंतचे खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे. |

| | | |
|---|---|---|
| | चहापान, अल्पोपहार, भोजन, पुष्पगुच्छ, फुलांचे हार, फोटोग्राफी, व्हिडीओग्राफी इत्यादी व्यवस्था भाड्याने घेणेकामी येणाऱ्या खर्चास मंजुरीबाबत. | अनुमोदक - छाया पाटील सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| १४ | वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी माताबाल संगोपन केंद्रे व विजयनगर - तुळींज रुग्णालयामध्ये अतिदक्षता विभाग सुरू करणेकामी मान्यता मिळणेबाबत. | **ठराव/निर्णय :-** वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी माताबाल संगोपन केंद्रे व विजयनगर-तुळींज रुग्णालयामध्ये अतिदक्षता विभाग सुरु करणेकामी मान्यता मिळणेबाबतच्या विषयावर सभागृहात सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यात आला की, वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील बोळींज, नारिंगी, सर्वोदय वसाहत, सातिवली व जुचंद्र या ५ ठिकाणी अस्तित्वातील नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये माताबाल संगोपन केंद्रे सुरु करणेस व नालासोपारा येथिल विजयनगर-तुळींज रुग्णालयात अतिदक्षता विभाग सुरु करणे तसेच या दोन्ही कामी लागणारी औषधे, उपकरणे, फर्निचर, लॅब रिएजंट, यंत्रे, कापडप्रकार, स्टेशनरी खरेदी, स्टेशनरी छपाई, जनित्र, रुग्णवाहीका व इतर साहित्य खरेदी या सर्व बाबींवर सन २०१६-१७ या वित्तीय वर्षामध्ये आर्थिक तरतुद करुन प्रस्तावातील नमुद सर्व बाबींवरील एकुण खर्चास तसेच बांधकाम दुरुस्ती व नुतनीकरणाकरिता NUHM अंतर्गत रु.७०,८९,०००/- मंजूर झालेल्या PIP मधुन खर्च करणेस व भविष्यात याकामी होणाऱ्या प्रस्तावातील नमुद बाबींवर येणा-या संपूर्ण खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यात देत आहे.<br>अनुमोदक - पंकज ठाकूर सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| १५ | वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाच्या दैनंदिन कामकाजाच्या व्यवस्थापनेसाठी सन २०१६/१७ वर्षाकरीता आवश्यकतेप्रमाणे औषधे खरेदी, उपकरणे खरेदी, किरकोळ साहित्य खरेदी, ऑक्सिजन सिलेंडर सेवा, साहित्य उपकरणे देखभाल दुरुस्ती या कामांच्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत. | **ठराव/ निर्णय :-** वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाच्या दैनंदिन कामकाजाच्या व्यवस्थापनेसाठी सन २०१६/१७ वर्षा करीता आवश्यकते प्रमाणे औषधे खरेदी, उपकरणे खरेदी, किरकोळ साहित्य खरेदी , ऑक्सिजन सिलेंडर सेवा, साहित्य उपकरणे देखभाल दुरुस्ती या कामांच्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळण्याबाबतच्या विषयावर सभागृहात सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यांत आला की, सदर कामी वार्षिक दराच्या ई निविदा प्रक्रिया करून पुढील कार्यवाही करणेस ही सभा मंजुरी देत असुन याकामी येणाऱ्या संपुर्ण खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>अनुमोदक - भारती देशमुख सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| १६ | सन २०१६-१७ ह्या वित्तीय वर्षासाठी महानगरपालिकेस भाडे तत्वावर यंत्रसामुग्री घेण्यास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत. | **<u>ठराव / निर्णय</u> :-** उपरोक्त प्रस्तावात नमुद केल्यानुसार वसई विरार शहर महानगरपालिकेस सन २०१६-२०१७ ह्या वित्तीय वर्षासाठी भाडेतत्वावर यंत्रसामुग्री मनुष्यबळासह घेणेकामी वार्षीक स्वरुपात निविदा मागविणेस तसेच याकामी होणाऱ्या रक्कम रु. रु. ३,००,००,०००/- पर्यंतच्या खर्चास आजची सर्वसाधारण सभा प्रशासकिय व वित्तीय मंजुरी देत आहे.<br>अनुमोदक - चंद्रकांत गोरीवले सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे) |

| | | |
|---|---|---|
| | | ठराव सर्वांनुमते मंजुर |
| **१७** | सन २०१६-१७, २०१७-१८ व २०१८-१९ ह्या वित्तीय वर्षासाठी महानगरपालिकेस भाडेतत्वावर वाहने घेण्यास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत. | **<u>ठराव / निर्णय</u> :-** उपरोक्त प्रस्तावात नमुद असल्याप्रमाणे वसई विरार शहर महानगरपालिकेस सन २०१६-२०१७, २०१७-२०१८ व २०१८-२०१९ ह्या आगामी तीन वित्तीय वर्षासाठी मनुष्यबळासह वाहने भाडेतत्वावर घेणेकरिता वार्षीक स्वरुपात निविदा मागविणेस तसेच त्याकामी होणाऱ्या अंदाजपत्रकिय रक्कम रु. ६,०२,६२,०००/- पर्यंतच्या खर्चास आजची सर्वसाधारण सभा प्रशासकिय व वित्तीय मंजुरी देत आहे.<br>अनुमोदक - महेश पाटील सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वांनुमते मंजुर |
| **१८** | वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नवघर (पूर्व) कडील पायलट इंड. जवळील महापालिकेचे सुलभ शौचालय देखभाल व चालविणेस मुदतवाढ मिळणेबाबत. | **ठराव / निर्णय** :- वरील प्रमाणे सदर प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन महानगरपालिकेच्या प्रभाग ड मधील नवघर पूर्वेस बांध वापरा व हस्तांतरण करा या तत्वावर बांधलेल्या सुलभ शौचालय देखभाल / चालविणेंस प्रस्तावामध्ये नमुद केल्यानुसार त्यांनी उत्तम प्रकारे सेवा दिलेली आहे. तरी ९ वर्षाचा कालावधी संपत आलेला आहे. त्या पुढे ९ वर्ष मुदतवाढ देणेंस ही सभा मंजुरी देत आहे.<br>अनुमोदक - प्रकाश रॉड्रीक्स सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वांनुमते मंजुर |
| **१९** | महिला व बालकल्याण विभागामार्फत महानगरपालिका हद्दितील सर्व भाषिक शाळेत (इंग्रजी माध्यम वगळून) शिकणाऱ्या इ. १ ली ते १० वी च्या विद्यार्थ्यांना महानगरपालिकेच्या परिवहन सेवेचा ५०% दराने वार्षिक मोफत पास योजना राबविणे व त्यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता देणेबाबत. | **निर्णय :-** महिला व बालकल्याण समितीच्या शिफारशी नुसार महानगरपालिका हद्दीतील सर्व भाषिक शाळेत (इग्रंजी माध्यम वगळून) शिकत असणा-या ज्या विदयार्थ्यांची घरे अदांजे शाळेपासून २ ते ३ कि मी. अतंरापेक्षा जास्त आहेत अशा मुलांना या योजनेचा लाभ देण्यात यावा. ज्या मुलांना महापालिकेच्या सायकल वाटप योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे अशा मुलांना बस पास योजनेचा लाभ देता येणार नाही. शाळेच्या मागणीनुसार पात्र लाभार्थ्यांना महिला व बालकल्याण विभागा मार्फत महानगरपालिका हद्दीतील सर्व भाषिक शाळेत (इग्रंजी माध्यम वगळून) शिकणा-या इ. १ ली ते १०वीच्या विदयार्थ्यांना महानगरपालिकेच्या परिवहन सेवेचा ५०% दराने माहे १ जुन ते ३० एप्रिल या ११ महिन्याच्या कालावधी करिता मोफत पास योजना राबविणे कामी येणा-या अदांजे ३,५०,००,०००/-(तीन कोटी पन्नास लाख रु. मात्र ) अपेक्षित खर्चास ही सभा सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.<br>अनुमोदक - भारती देशमुख सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वांनुमते मंजुर |
| **२०** | सन २०१५-१६ करीता महानगरपालिकेने अहिल्याबाई होळकर योजने अंतर्गत शाळेच्या विद्यार्थ्यांना ३३.३३ टक्के प्रमाणे देण्यात येणाऱ्या बस पासासाठी ५० टक्के पर्यंत वाढ करणे व सर्वसामान्य विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या पासासाठी ५० टक्के | **<u>ठराव</u> :-** मुंबई महानगर प्रादेशिक परिवहन प्राधिकरण क्षेत्रामधील इतर परिवहन सेवेचे प्रवासी भाडे दर व वसई विरार शहर महानगरपालिका परिवहन सेवेचे भाडेदर ह्यामध्ये तफावत आहे. वसई विरार शहर महानगरपालिका परिवहन सेवेचे प्रवासी भाडे इतर मनपा परिवहन सेवेच्या तुलनेत कमी आहे. त्याचप्रमाणे मनपा परिवहन सेवेच्या बसमधुन प्रवास करणाऱ्या शालेय विद्यार्थी, महाविद्यालयीन विद्यार्थी/विद्यार्थीनी ह्यांना ६६.६६% सवलत देण्यात येते. जेष्ठ नागरिकांना ५०% सवलत देण्यात येते. अंध अपंगाना ५०% सवलत देण्यात येते. फक्त ठाणे मनपा परिवहन सेवेमध्ये शालेय विद्यार्थ्यांना ५०% सवलत देण्यात येते. या धर्तीवर पुढे सन २०१६ -१७ या आर्थिक वर्षापासुन ३३.३३% दराची वाढ ५०% पर्यंत करण्यात येत आहे.वसई विरार शहर महानगरपालिके |

| | | |
|---|---|---|
| | पर्यंत वाढ करणे व फरकाची रक्कम अदा करणे बाबत. | मार्फत शालेय मुलांना ५०% दराने वार्षिक मोफत पास योजनेचा लाभ देण्यात यावा व ही योजना धोरणात्मक कायमस्वरुपी राबविण्यात यावी.<br>तसेच मे. भागिरथी ट्रान्स कार्पो प्रा. लि. ह्यांनी परिवहन सेवेमार्फत देण्यात येणाऱ्या विविध सवलती, बसेसच्या सुट्या भागामध्ये झालेली दरवाढ, केंद्र शासनाकडून सेवाकरामध्ये केलेली दरवाढ व राज्यशासनाच्या नविन आदेशाप्रमाणे कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायद्याप्रमाणे द्यावे लागणारे वेतनवाढ, बोनस , प्राव्हिडंड फंड दरवाढ या सर्व बाबीमुळे परिवहन सेवेला तोटा झाला असुन परिवहन सेवा चालवणे कठीण झाले आहे.महानगरपालिकेकडुन काहि प्रमाणात अर्थसहाय्य मिळाल्यास त्यांना पुढील वर्षी सेवा देणे योग्य होईल. या सर्व बाबींचा विचार करुन आर्थिक अडचणीतुन बाहेर पडण्यासाठी त्यांनी केलेल्या विनंती अर्जानुसार महिला व बालकल्याण विभागा मार्फत शालेय मुलांना पुरविण्यात आलेल्या पासाच्या फरकाची रक्कम रु.६७,८५,९३१/- व परिवहन सेवे मार्फत सर्वसामान्य मुलांना देण्यात आलेल्या पासाच्या फरकाची रक्कम ५३,१६,७३५/-असे दोन्ही मिळून एकुण अदांजे वार्षिक फरकाची रक्कम रु. १,२१,०२,६६६ /- अनुदान रुपाने महानगरपालिकेकडु मे. भागिरथी ट्रान्स कार्पो प्रा. लि. हयांना अदा करण्यास हि सभा सार्वानुमते प्रशासकिय व वित्तीय मंजुरी देत आहे.<br>अनुमोदक - प्रज्ञा देसाई सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वांनुमते मंजुर |
| २१ | सन २०१६-१७ या आर्थिक वर्षामध्ये महानगरपालिका हद्दितील जि.प. शाळेत व अंगणवाडी / बालवाडीत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना आवश्यकतेनुसार शैक्षणिक साहित्य वाटप करणेबाबत. | **निर्णय :-** वसई - विरार शहर महानगरपालिका हद्दीत जि. प च्या एकूण १४७ शाळांमध्ये शिकत असलेल्या अदांजे २५००० विदयार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यात यावा. या सर्व विदयार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात यावे मा. महिला व बालकल्याण समितीने शिफारस केल्याप्रमाणे रेनकोट ,क्रिडा साहित्य, दप्तर, बुट, मोजे, वहया, कंम्पास बॉक्स, कलर बॉक्स संगणक संच इत्यादी.शालेय उपयोगी साहित्य वाटप करण्यात यावे. तसेच अदांजे ४१६ अगंणवाडीत १७,५०० शिकत असलेल्या मुलांना सॅग, टिफिन बॉक्स, वॉटर बॅग,वजन काटा इत्यादी साहित्य वाटप करण्यात यावे.<br>सदरचे साहित्य वाटप करणे कामी महानगरपालिकेच्या वाहन विभागामार्फत साहित्य वाटपाचे काम पुर्ण होई पर्यंत वाहने उपलब्ध करुन देण्यात यावी व मंजूर ठेकेदारा मार्फत साहित्य ने-आण करण्याकरिता साहित्य वाटपाचे काम पुर्ण होईपर्यंत मजूर कर्मचारी उपलब्ध करुन देण्यात यावे. सदरचे साहित्य खरेदी करणे कामी "ई " निविदा प्रक्रिया करणेकरिता येणा-या अदांजे ३,००,००,००० /-( तीन कोटी रु. मात्र) पर्यंत च्या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मंजूरी देत आहे.<br>अनुमोदक - मनिषा जाधव सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वांनुमते मंजुर |
| २२ | सन २०१६-१७ या वित्तीय वर्षाकरीता महानगरपालिका हद्दीत समाविष्ट असलेल्या शाळेतील इयत्ता ८ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांना सायकली वाटप करणेबाबत. | **निर्णय :-** सदर योजनेचा लाभ महानगरपालिका हद्दीत समाविष्ट असलेल्या शाळेतील इ. ८ वी व ९ वी १०वी च्या विदयार्थ्यांना या सायकल योजनेचा लाभ देण्यात यावा.या करिता जे विदयार्थी शाळेपासून २ ते ५ कि.मी अतंरावरुन प्रवास करत असतात अशा विदयार्थ्यांना (मुले व मुली) या योजनेत पात्र ठरविण्यात यावे. ज्या मुलांना बस पास योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे अशा मुलांना सायकल योजनेचा लाभा देण्यात येणार नाही. या करिता महापालिका हद्दीतील विविध शाळेतील अदांजे १,२०० मुला, मुलींना सायकली खरेदी करणे कामी ई निविदा प्रक्रिया करुन खरेदी करण्यास येणा-या अदांजे ६०,००,०००/-(साठ लाख |

| | | |
|---|---|---|
| | | मात्र) खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यात येत आहे.<br>अनुमोदक - उजमा पिरखान सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| २३ | वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये जमिनीचे सर्व्हेक्षण करण्यासाठी सर्वेअरची नेमणुक करुन ई-निविदा मागविणेकामी मान्यता देणेबाबत. | <u>**प्रस्तावाचा निर्णय :-**</u> वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये जमिनीचे सर्व्हेक्षण करण्यासाठी सर्वेअरची नेमणूक करणे कामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत असून ई - कार्यप्रणालीद्वारे निविदा दर मागविण्यात यावेत असे ही सभा ठरविते आहे.<br>अनुमोदक - पंकज चोरघे सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| २४ | सन २०१६-१७ ह्या वित्तीय वार्षिक वर्षाकरीता वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या स्मशानभुमीकरीता कास्ट आयर्नच्या शवदाहिन्या पुरवठा करणे कामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यता घेणेबाबत. | <u>**प्रस्तावाचा निर्णय :-**</u> सन २०१६-१७ ह्या वित्तीय वार्षिक वर्षाकरिता वसई - विरार शहर महानगरपालिकेच्या स्मशानभूम्याकरिता कास्ट आयर्नच्या शवदाहीन्या पुरवठा करणेस होण्याऱ्या खर्चास ही सभा मान्यता देत आहे व सदर कामाच्या निविद 'ई' निविदा कार्यप्रणालीद्वारे निविदा दर मागविण्यात यावेत असे ही सभा ठरविते आहे.<br>अनुमोदक - वृंदेश पाटील सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| २५ | वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती A, B, C, D, E, F, G, H, I मधील फुटपाथ डिव्हायडर्स व कर्ब स्टोन दुरूस्ती वगैरे कामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देऊन वार्षिक ई-निविदा मागविणेबाबत. | <u>**प्रस्तावाचा निर्णय :-**</u> वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती A,B,C,D,E,F,G,H,I मधील फुटपाथ, डिव्हायडर्स व कर्ब स्टोन दुरुस्ती वगैरे कामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता येत असून ई - कार्यप्रणालीद्वारे निविदा दर मागविण्यात यावेत असे ही सभा ठरविते आहे.<br>अनुमोदक - कन्हैया भोईर सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| २६ | सन २०१६-२०१७ या वित्तीय वार्षिक वर्षाकरीता वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात प्रिकास्ट आर.सी.सी. झाकणे पुरविणे व बसविणे कामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देऊन ई-निविदा मागविणेकामी मान्यता देणेबाबत. | <u>**प्रस्तावाचा निर्णय :-**</u> वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात प्रिकास्ट आर.सी.सी.झाकणे पुरविणे व बसविणे कामी होणाऱ्या खर्चास वित्तीय व प्रशासकीय मान्यता देण्यात येत असून ई - कार्यप्रणालीद्वारे निविदा दर मागविण्यात यावेत असे ही सभा ठरविते आहे.<br>अनुमोदक - संजय पिंगुळकर सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| २७ | सन २०१६-२०१७ या वित्तीय वार्षिक वर्षाकरीता वसई-विरार शहर | <u>**प्रस्तावाचा निर्णय :-**</u> सन २०१६-१७ या वित्तीय वार्षिक वर्षाकरिता वसई विरार शहर महानगरपालिकेच्या विविध विभागातील विविध उद्याने, स्मशानभून्या व इतर ठिकाणी बसण्याकरिता बेंचेस पट्टया व संबधित इतर आवश्यक साहित्य पुरविणे कामी होणाऱ्या |

| | | |
|---|---|---|
| | महानगरपालिकेच्या विविध विभागातील विविध उद्याने, स्मशानभुन्या व इतर ठिकाणी बसण्याकरीता बेंचेस, पट्ट्या व संबंधित इतर आवश्यक साहित्य बसविणे कामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेणेबाबत. | खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय देऊन सदर कामाच्या निविदा 'ई' निविदा कार्यप्रणालीद्वारे निविदा दर मागविण्यात यावेत असे ही सभा ठरविते आहे.<br>अनुमोदक - रुपेश जाधव सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| २८ | वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती A, B, C, D, E, F, G, H, I मधील कार्यक्षेत्रात रस्त्यावरील खड्डे बुजविणे, डागडुजी करणे वगैरे कामी होणाऱ्या अंदाजपत्रकीय खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देऊन ई-निविदा मागविणेकामी मान्यता देणेबाबत. (सन २०१६-१७) | **प्रस्तावाचा निर्णय :-** वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती A,B,C,D,E,F,G,H,I मधील कार्यक्षेत्रात रस्त्यावरील खड्डे बुजविणे, डागडुजी करणे वगैरे कामी होणाऱ्या अंदाजपत्रकीय खर्चास वित्तीय व प्रशासकीय मान्यता देण्यात येत असून ई - कार्यप्रणालीद्वारे निविदा दर मागविण्यात यावेत असे ही सभा ठरविते आहे.<br>अनुमोदक - रमेश घोरकना सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| २९ | प्रभाग समिती "ई" कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ९४ मधील निर्मळ येथील विमल तलावाच्या बाहेरील लोखंडी जाळी बसविणे कामास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत. | **ठराव / निर्णय :-** वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमुद कामास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्यात येत आहे व तसेच पुढील आवश्यक निविदा कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.<br>अनुमोदक - पंकज चोरघे सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| ३० | स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणी आढावा. | **ठरावाचा निर्णय :-** वरील प्रस्तावात अवगत केल्यानुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) या महत्वाकांक्षी योजनेची महापालिकेच्या कार्यक्षेत्रात प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने केलेल्या उपाययोजना व प्रस्तावित उपाय योजनांना ही सभा मान्यता प्रदान करीत आहे.<br>अनुमोदक - नितीन राऊत सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर |